# भारताचा कायदेशीर आराखडा: व्यवसाय सुलभता, एमएसएमई सक्षमीकरण आणि गुंतवणूक-मित्र सुधारणा यांचा नवा युग

नागपूर दि. २७ (प्रतिनिधी)- भारत आज कायदेशीर आणि नियामक क्षेत्रात मोठ्या परिवर्तनातून जात आहे. व्यवसाय सुलभता, एमएसएमई पुनरुज्जीवन, वादांचे जलद निराकरण आणि एम अँड ए (विलिनीकरण-अधिग्रहण) साठी सक्षम वातावरण तयार करणे हे सुधारणा कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी आहे. ''भारताचा कायदेशीर परिदृश्य: व्यवसाय सुलभता, एमएसएमई पुनरुज्जीवन आणि जबाबदार भांडवलाला चालना'''' या परिषदेसंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत एयू कॉर्पोरेट ॲडव्हायझरी आणि लीगल सर्व्हिसेसचे संस्थापक श्री. अक्षत खेतान यांनी उद्योजकता व गुंतवणूक वाढीस कायदे कसे हातभार लावत आहेत यावर भाष्य केले.

श्री. खेतान म्हणाले, ''आज कायदा अडथळा नाही, तर व्यवसायाचा भागीदार आहे. आम्ही पारदर्शक, पूर्वनिश्चित आणि उद्योजक-मित्र कायदेशीर वातावरण निर्माण करण्यास वचनबद्ध आहोत.'' कॉर्पोरेट गव्हर्नन्स, डिजिटल फाइलिंग, सुलभ पालन प्रक्रिया व जागतिक गुंतवणुकीस प्रोत्साहन देणाऱ्या तरतुदीमुळे भारत व्यवसायासाठी अधिक स्पर्धात्मक ठरत आहे.